संक्षिप्त फौजदारी केस नं. १९५/२०२४
नि. क्र. २३

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – मुज्ञमिल लतिफ पाटणकर,

**वय**– ४७ वर्षे , **व्यवसाय** – रिक्षा व्यवसाय,

**राहणार**– देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.ए.एल.दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१.** दिनांक २३/०६/२०२४ रोजी मी देवरुख स्टॅण्डकडून साडवलीकडे माझ्या रिक्षाने निघालो होतो. सह्याद्रीनगर चोरप–याजवळ हनुमान मंदिर येथे अपघात झाला होता. तेथे रिक्षा पलटी झाली होती व एस.टी. पुढे जावून थांबली होती. तेथे पोलिस आले होते. त्यांनी मला पंचनामा करायचा असून पंच म्हणून सही करण्यास सांगितले होते. तेथे रिक्षाचालक व आणखी काही माणसे हजर होती. पोलिसांनी तेथे पंचनामा करुन तेथील ठिकाणची व आमची छायाचित्रे घेतली व पंचनाम्यावर माझी स्वाक्षरी घेतली होती. *(साक्षीदारास निशाणी क्र. २२ कडील पंचनामा दाखविण्यात आला.)* तो तोच असून त्यावर अनुक्रमांक ०२ कडे माझी पंच म्हणून सही आहे. त्यातील मजकूर मी त्यावेळी वाचला होता व तो बरोबर आहे. *(साक्षीदारास प्रकरणातील वस्तू–अ कडील छायाचित्रे दाखविण्यात आली.) अनुक्रमांक ०१ कडील छायाचित्रात रिक्षा पलटी झाल्याचे दिसत आहे. अनुक्रमांक ०२ कडील छायाचित्रात पोलिस, मी, दुसरा पंच व रिक्षाचालक दिसत आहेत. अनुक्रमांक ०३ ते ०६ कडील छायाचित्रांत रिक्षा दिसून येत आहे. अनुक्रमांक ०७ ते १० कडील छायाचित्रांत सदरची एस.टी. दिसून येत आहे.*

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. सी. आठल्ये यांचेतर्फे –</u>**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, देवरुख, साडवली व सह्याद्रीनगर हा माझा

नेहमीचा प्रवासाचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२४ मध्ये त्या रस्त्यावर पावसाळ्याच्या दिवसांत खड्डे होते. साक्षीदार पुढे सांगतो की, लहान खड्डे होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा पंचनामा कोणत्या गुन्हा नोंदणी क्रमांकातील होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील नमुद गाडी क्रमांक व चतुःसिमा मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात नमुद असलेले जखमी महिलेचे पुर्ण नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये असलेल्या नकाशात एस.टी. दर्शविली नसल्याचे मला काही कारण सांगता येणार नाही.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, सदरचा पंचनामा जागेवर करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर मी नुसत्या सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी आमची छायाचित्रे घेतल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोपीनाथ पवार हे देखील रिक्षाचालक असून ते माझ्या माहितीतील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आपल्यापैकी एका रिक्षाचालकाच्या रिक्षाचा अपघात झाल्याचे कळाल्याने मी तेथे पाहण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यासाठी या असे पोलिसांनी मला फोन करुन बोलावले होते, असे काही घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.07.27 17:50:43 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. २७.०७.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A. A. Shivalkar. |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 27/07/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 27/07/2026 |
| Evidence uploaded on | :- | 27/07/2026 |